जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे
कार्यकारी संपादक
विजय पाटील
संपादक मंडळ
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

## उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका

# भाजपने बनवलेले धर्मांध ध्रुवीकरणाचे आणि जातीय समीकरणाचे जहाल रसायन

**सीताराम येचुरी**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांत भाजपला प्रचंड बहुमत मिळाले. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्यात त्यांना २०१४ची कामगिरी राखता आली. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांना उत्तर प्रदेशात ४२.३ टक्के तर उत्तराखंडमध्ये ५५.३ टक्के मते पडली होती. या विधानसभा निवडणुकांत उत्तर प्रदेशात ३९.७ टक्के तर उत्तराखंड राज्यात ४६.५ टक्के मते भाजप मिळवू शकला. पंजाब राज्यात मात्र अकाली दल-भाजप आघाडीला काँग्रेसने जबरदस्त धोबीपछाड देत मोठ्या फरकाने विजय मिळवला. गोवा व मणिपूर राज्यात काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला असला, तरी त्याला बहुमत गाठता न आल्याने, भाजपने दोन्हीकडे सत्ता बळकावली. जनतेचा कौल धुडकावून लावत भाजपने या दोन्ही राज्यांत बहुमत मिळवण्याकरता धाकदपटशा आणि पैशाचे आमिष या दोन्हींचे कॉकटेल बनवून बहुमताचा आकडा गाठला.

भाजपने दावा केला आहे की, त्याने दिलेले उत्तम प्रशासन व नोटाबंदीला मिळालेली ही पावती आहे. मात्र पंजाब, गोवा व मणिपूर येथील त्याची कामगिरी बघता, हा दावा अगदीच पोकळ असल्याचे दिसून येते. उत्तर प्रदेश व उत्तराखंड येथे भाजपला मिळालेल्या विजयाची अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारण आहे ते म्हणजे धर्मांध ध्रुवीकरण व जातींवर आधारित सामाजिक अभियांत्रिकीचे त्यांनी वापरलेले रसायन.

आजघडीला लोकसभेत भाजपकडे एकही मुस्लीम खासदार नाही. उत्तर प्रदेश व उत्तराखंड या राज्यांत त्यांनी एकाही मुस्लीम उमेदवाराला तिकीटसुद्धा दिलेले नाही. यातून जाणारा संदेश स्पष्ट आहे. हा तोच संदेश आहे जो २०१४ साली तथाकथित यशस्वी 'गुजरात मॉडेल'च्या नावावर देण्यात आला. २००२ साली गुजरातेत घडवून आणलेल्या दंगलीत मुस्लिमांच्या हत्या करून ते राज्य 'पवित्र' करण्यात आले, असा हा धर्मांध ध्रुवीकरण मजबूत करण्याच्या कावेबाज प्रचारतंत्राचा भाग होता. मात्र 'गुजरात मॉडेल'चे सर्व दावे प्रत्यक्षात फोल व धादांत खोटे ठरले आहेत.

'कबरस्तान आणि स्मशानघाट'; 'ईद आणि दिवाळी' अशांसारखे बोचरे संदर्भ वापरून पंतप्रधान मोदींनी या भयंकर धर्मांध मोहिमेची सुरुवात केली. भाजप अध्यक्षांनी यात काँग्रेस, समाजवादी पक्ष व बहुजन समाज पक्ष करीत असलेल्या मुस्लिमांच्या 'तुष्टीकरणाची' भर घातली. या तुष्टीकरणाचे 'कसाब' असे नामकरण करून त्यांनी आपल्या शब्दसंग्रहात भर घातली. परिणामी प्रमुख विरोधी पक्षांचे पाकिस्तान पोसत असलेल्या सीमेपलीकडील दहशतवाद्यांशी संगनमत असल्याचा आभास निर्माण झाला. तर या उलट भाजपने 'सर्जिकल स्ट्राईक'च्या यशाचे श्रेय घेत आपल्या पाकिस्तान-विरोधी व पर्यायाने मुस्लीम-विरोधी भूमिकेची टिमकी वाजवून घेतली. मात्र या सर्जिकल स्ट्राईकनंतर अवघ्या तीन महिन्यांत त्यापूर्वीच्या तीन महिन्यांपेक्षा दुप्पट जास्त भारतीय जवानांचा सीमेवर बळी गेला व हे दावे पोकळ व मतलबी असल्याचे सिद्ध झाले.

ज्या राज्यांत मुस्लीम लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे, केवळ अशाच राज्यांत या प्रकारची धर्मांध मोहीम प्रभावीपणे राबवता येणे शक्य आहे. म्हणूनच इतर राज्यांत भाजप यश मिळवू शकला नाही. आरएसएसने आपले नेहमीचे अफवा पसरवण्याचे तंत्र वापरून 'मुस्लीम सरकार येऊ घातल्याची' आवई उठवत मतदारांना धर्मनिरपेक्ष पक्षांच्या विरोधात संघटित केले.

काँग्रेस-सपा व बहुजन समाज पार्टी हे सर्वच पक्ष या जाळ्यात अडकले. स्वत:चे वेगळे पर्यायी जाळे काही त्यांना विणता आले नाही. बहुजन समाज पक्षाच्या नेत्या आपण, शंभर मुस्लीम उमेदवारांना उभे केल्याचे वारंवार सांगून अल्पसंख्याक समाजाला काँग्रेस-सपाला मते न देण्याचे आवाहन करीत राहिल्या. आपले 'मुस्लीम-प्रेम' अधिक विश्वसनीय असल्याचे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

त्याचवेळी, भाजपने आपल्या निवडणूक मोहिमेत सामाजिक अभियांत्रिकी (जातींचे समीकरण) चपखलपणे बसवत यादवेतर इतर मागासवर्गीय व जाटवेतर दलित यांना, यादवांचा पाठिंबा असलेला सपा व जाटवांचे समर्थन असलेला बसपा यांच्याविरुद्ध एकत्रित केले.

धर्मनिरपेक्ष विरोधी पक्षांनी जनतेच्या प्रश्नांवर आक्रमकपणे पुढे न येणे भाजपला अधिकच फायद्याचे ठरले. आता बरेचजण असे म्हणू लागले आहेत, की बिहार विधानसभा निवडणुकांप्रमाणे उत्तर प्रदेशातही जर 'महाज्योत' निर्माण झाली असती, तर भाजपला रोखणे सहज शक्य झाले असते. सपा, काँग्रेस, बसपा आणि राष्ट्रीय लोकदल यांच्या मतांची एकत्रित आकडेवारी बघितली तर ही 'महाज्योत' सहज ३१३ जागा जिंकू शकली असती व भाजपला केवळ ९० जागांवर समाधान मानावे लागले असते, असे म्हटले जाते.

पण दुर्दैवाने राजकारण म्हणजे केवळ गणिताचा खेळ नव्हे. भाजपच्या धर्मांध कार्यक्रमाला प्रत्युत्तर नरेंद्र मोदी व त्यांच्या पक्षाच्या योजनांविरुद्ध पर्यायी योजना उभ्या करूनच दिले जाऊ शकते. अशा प्रकारे लोकाभिमुख पर्याय उभा करणे शक्य होते. विशेषत: नोटाबंदीमुळे समाजातील गरीब व वंचित घटकांवर जे आर्थिक अरिष्ट कोसळले आहे, ते पाहता हे होऊ शकले असते. देशाच्या जीडीपीत ४० टक्के वाटा असणारी व ८० टक्के नोकऱ्या निर्माण करणारी अनौपचारिक अर्थव्यवस्था या नोटाबंदीमुळे साफ कोलमडली, हे स्पष्ट आहे.

उत्तर प्रदेशातील ग्रामीण जीवन उद्ध्वस्त झाले आहे. चलनी नोटा मिळत नसल्याने शेतकऱ्यांना नाईलाजाने सरकारने जाहीर केलेल्या किमान आधार भावाच्या निम्म्या भावात आपला माल विकावा लागला. या सर्व त्रस्त घटकांपर्यंत पोहोचून त्यांना भाजपची आर्थिक धोरणे व नरेंद्र मोदींच्या नोटाबंदीविरुद्ध संघटित करण्याऐवजी सपा-काँग्रेस व बसपा हे पक्ष स्वत:च भाजपने विणलेल्या जाळ्यात अडकले.

यामुळे ही नोटाबंदी श्रीमंतांविरुद्ध व गरिबांसाठी होती या भाजपच्या प्रचाराला बळकटी मिळाली. वस्तुस्थिती याच्या अगदी उलट आहे. लोकसभेच्या हिवाळी सत्रातच या पक्षांच्या भूमिकांचा अंदाज आला होता. एकूण १६ पक्षांनी संसदेत या नोटाबंदीला विरोध दर्शवला होता. डाव्या पक्षांनी भर दिल्यामुळे २८ नोव्हेंबर २०१६ला देशभरात एक दिवसीय सार्वत्रिक संपाची हाक देण्यात आली होती. प्रमुख धर्मनिरपेक्ष विरोधी पक्षांनी या संपाचे केवळ तोंडी समर्थन केले. लोकांना प्रत्यक्ष संपात उतरवण्याचे काम मात्र यापैकी कोणीही केले नाही. यामुळे भाजपचा प्रचार प्रभावी ठरला. सर्व प्रमुख विरोधी भांडवली पक्ष भाजपच्या जाळ्यात अडकले व केवळ जाती-धर्मांवर आधारित राजकारण करून मते मिळवण्यात गुंतून पडले.

भाजपचे ढोल वाजवणारी भांडवली प्रसारमाध्यमे व पैशाचा विक्रमी वापर यामुळे भाजपची बाजू तेवढी प्रकर्षाने जनतेपुढे आली. पर्यायी कार्यक्रम देण्याचा प्रयत्न केवळ डाव्या पक्षांनी केला, तो एकाकी ठरला. केरळ व इतर अनेक राज्यांत ज्या प्रमाणात डाव्या पक्षांचा जोर आहे तसा तो उत्तर प्रदेश व उत्तराखंड राज्यात नसल्याने भाजपला सक्षम पर्याय पुढे आला नाही व त्याचा त्यांनी फायदा घेतला.

या निवडणुकीत राजकीय पक्षांतील भ्रष्टाचार निपटून काढण्याविषयी भाजपला किती आस्था आहे, हेदेखील प्रकर्षाने दिसून आले. भाजपने केलेला पैशाचा वापर तर अभूतपूर्वच म्हणावा लागेल. सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे न येतादेखील मणिपूर व गोवा या राज्यांत भाजप बहुमत गाठू शकला, यात सर्वात महत्त्वाचा वाटा या पैशाच्या महापुराचा आहे, यात शंका नाही.

पैशाच्या अनिर्बंध वापरावर अंकुश ठेवणारी सशक्त निवडणूक सुधारणा लागू करणे आता अत्यंत निकडीचे झाले आहे. भाजप व पंतप्रधान मोदी यांना पर्याय उभा करण्याचा सर्वात खात्रीशीर मार्ग हा देशातील डाव्या व लोकशाही शक्तींची भक्कम एकजूट उभारणे, हाच आहे. असे झाले तरच भाजपचा धर्मांध अजेंडा रोखता येऊन, भारतीय प्रजासत्ताकाच्या धर्मनिरपेक्ष व लोकशाही पायाचे संरक्षण होऊ शकेल.

शेवटी काढता येण्यासारखा एकच निष्कर्ष आहे, तो म्हणजे या धर्मांधतेच्या राक्षसाला गाडायचे असेल, तर जनतेने उभारलेल्या मजबूत लोकलढ्यांशिवाय दुसरा काहीही पर्याय नाही.

**(अनुवाद : प्राची हातिवलेकर)**

# आदित्यनाथ यांची उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी झालेली निवड

**पॉलिटब्यूरो निवेदन**

भाजपने योगी आदित्यनाथ यांची उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी निवड करणे, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या निर्णयाची भाजप या त्याच्या राजकीय शाखेने केलेली ही अंमलबजावणी राज्याकरता घातक ठरणार आहे.

आदित्यनाथ हे कुप्रसिद्ध हिंदुत्ववादी कट्टरपंथी असून त्यांचा दृष्टीकोन आत्यंतिक जातपातवादी आहे. जातीय दंगली भडकावण्यासंदर्भातील अनेक फौजदारी गुन्हे त्यांच्यावर दाखल आहेत.

'सबका साथ, सबका विकास' या वारंवार स्वत:च दिलेल्या घोषणेची पंतप्रधान मोदी यांनी आदित्यनाथ यांची निवड करून रेवडी उडवली आहे.

या परिस्थितीत उत्तर प्रदेशातील सर्व लोकशाही, धर्मनिरपेक्ष शक्तींनी एकत्र येऊन राज्यातील धार्मिक सलोखा कायम राहावा तसेच सर्व समाजातील नागरिकांचे घटनात्मक हक्क सुरक्षित राहावे, यासाठी झटण्याचे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करीत आहे.

★ ★ ★

**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांची वार्षिक वर्गणी**

जीवनमार्ग - रु. ४००, लोकलहर - रु. २५० पीपल्स डेमॉक्रसी - रु. ३५०, मार्क्सिस्ट - रु. १००

# भगतसिंग आणि क्रांतिकारकांचे बलिदान : एक अन्वय

**डॉ. माया पंडित**

भारतावर राज्य गाजवणाऱ्या साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेने भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू या तीन क्रांतिकारकांना दि. २३ मार्च १९३१ रोजी फासावर चढविले. त्यांच्या तेजस्वी बलिदानाचे स्मरण करण्याचा हा दिवस आपल्या देशाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा आहे. देशभक्त कोणाला म्हणायचे ? खरी देशभक्ती कशात असते ? देशभक्तीचा विचार नेमका काय असतो ? त्या क्रांतिकारकांनी कोवळ्या वयात आपले बलिदान नेमके कशासाठी केले ? हे समजून घेण्याची निकड कधी नव्हे इतक्या तीव्रतेने आज जाणवते आहे. कारण आज चोहीकडे आपल्याला राष्ट्रप्रेमाच्या नावाने गळे काढलेले ऐकू येताहेत. भाकरी व रोजगाराचा, शिक्षणाचा आणि आरोग्याचा हक्क मागणाऱ्या लोकांचा आवाज दाबून टाकला जातो आहे. दलितांना त्यांची जात खालची आहे, मुसलमानांना त्यांचा धर्म वेगळा आहे, आणि कम्युनिस्टांना त्यांची विचारसरणी स्वातंत्र्याचा उद्घोष करण्याची, दडपलेल्या समूहांच्या हक्कांसाठी झगडण्याची आहे या कारणांसाठी जिवे मारले जाते आहे. काश्मीर पासून केरळपर्यंत आपल्याला सत्तेमत्तेचा उन्माद चढलेली भगवी सेना निरनिराळ्या रूपांमध्ये नंगा नाच घालताना, हिंसाचाराचे थैमान घालताना दिसते आहे. अशा वेळी साऱ्या बाजूंनी दाटून येणाऱ्या अंधारात भगतसिंग आणि त्यांच्या क्रांतिकारी कॉम्रेड्सनी केलेले बलिदान आणि मांडलेले विचार आपल्याला योग्य ती वाट दाखवू शकतात.



कोण होते हे क्रांतिकारक ? त्या काळी स्वातंत्र्याची मागणी करणारे लोक अनेक होते पण त्या साऱ्यांना ब्रिटिश सत्तेने फासावर दिले नाही. मग त्यांनाच फक्त फाशी का देण्यात आले ? त्यांच्यात नेमके असे काय होते ? त्यांना स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय अभिप्रेत होते ?

हे समजण्यासाठी तो काळ लक्षात घ्यायला हवा. एकीकडे १९२०च्या सुमाराला महात्मा गांधींची चळवळ सुरू झाली होती पण जमीनदारांविरुद्ध व जातीप्रथेविरुद्ध बोलायची त्यांची बिलकुल तयारी नव्हती. तर दुसरीकडे आरएसएस, हिंदू महासभा तसेच मुस्लिम लीग अशा धर्मांध राजकारण खेळणाऱ्या संघटनांची स्थापना झाली होती. १९१९ला जालियनवाला बागेचे अमानुष हत्याकांड झाले होते. दुसरीकडे १९२०मध्ये रशियात समाजवादी क्रांती झाली होती आणि कामगारवर्गाच्या सत्तेचे पडघम वाजत होते. भारताच्या कम्युनिस्ट पक्षाची ताश्कंद येथे स्थापना झाली होती. अशा वेळी भगतसिंग या सळसळत्या तरुण मुलावर व त्याच्यासारख्या अनेकांवर या घडामोडींचा प्रचंड प्रभाव पडला नसता तरच नवल. त्यांचे रक्त पेटले होते. प्रखर राष्ट्रवादाने झपाटलेल्या पित्याचा व काकाचा जाज्वल्य वारसा लाभलेल्या या युवकाला सभोवती चाललेले अन्यायाचे थैमान पहावेना. अगदी १९२२ मध्ये चौरीचौरा येथे शेतकऱ्यांनी भांडवलदार व जमीनदार यांच्याविरुद्ध काँग्रेसने केलेल्या आंदोलनात शेतकऱ्यांना व त्यांच्या झुंझार लढ्याला काँग्रेसने माघारी घेतले आणि हे आंदोलन जमीनदारांविरुद्ध करणे चुकीचे आहे असे गांधीजींनी जाहीर केले. सर्व प्रकारच्या गुलामगिरीविरुद्ध उभ्या ठाकलेल्या भगतसिंगासारख्या तरुणांना जुलमी व शेतकऱ्यांचे अतोनात शोषण करणाऱ्या जमीनदारी सत्तेचा गांधीजींनी केलेला बचाव हा शेतकऱ्यांचा क्रूर असा विश्वासघात वाटणे अत्यंत स्वाभाविक होते. त्यामुळे भगतसिंग व त्याच्यासारख्या अनेक युवकांना गुलामगिरीत खितपत पडलेल्या लाखो लोकांना सन्मानाचे आयुष्य जगण्याचा मार्ग दिसत होता तो मार्क्स, लेनिन व एंगेल्सच्या समाजवादी विचारांमध्ये.

याचवेळी सचिंद्रनाथ संन्याल या तरुणाच्या पुढारीपणाखाली एकत्र येऊन या युवकांनी १९२३ साली 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन' या क्रांतिकारी संघटनेची स्थापना केली होती आणि सार्वत्रिक मतदानाचा अधिकार, माणसाला माणसाने गुलामगिरीत ढकलण्याच्या सर्व जातीवर्गादी दास्यप्रथांचा अंत, रेल्वेचे राष्ट्रीयीकरण, खाणी आणि तत्सम उद्योगांचा देशाच्या साधनसंपत्तीसाठी विकास असे कार्यक्रम घेऊन उभ्या राहिलेल्या या संघटनेचा खूप मोठा प्रभाव भगतसिंगावर पडला होता. या संघटनेची शाखा त्याने लाहोर येथे १९२५ला स्थापन केली. एक रेल्वेची गाडी लुटल्याच्या आरोपावरून या संघटनेच्या सदस्यांना म्हणजे खुद्द संन्याल, राम प्रसाद बिस्मिल, अशफाकउल्लाह खान आणि ठाकूर रोशन सिंग या सदस्यांना सरकारने अटक केली आणि संन्यालांना जन्मठेप तर इतरांना फाशी चढविले. "सरफरोशीकी तमन्ना अब हमारे दिलमे है/देखना है जोर कितना बाजुए कातिलमे है", असे झुंझार गीत गात हे क्रांतिकारक फासावर गेले. भगतसिंगाचे रक्त उकळू लागले. भगतसिंगाने भगवतीचरण व्होरा, सुखदेव आणि रामकिशन या आपल्या सहकाऱ्यांसमवेत १९२६मध्ये नौजवान भारत सभेची स्थापना केली. भगतसिंगाचे विचार समाजवादी विचारांनी किती प्रभावित झालेले होते याचे प्रत्यंतर आपल्याला 'नौजवान भारत सभे'च्या उद्दिष्टांमध्ये दिसून येते. ही उद्दिष्टे कोणती होती ?:

१. शेतकऱ्यांचे व कष्टकऱ्यांचे स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य स्थापन करणे.

२. भारत हा एकसंध असावा म्हणून देशातील तरुणांच्या मनात राष्ट्रभक्ती जागवणे.

३. आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक स्तरावर चालणाऱ्या शोषणाविरुद्धच्या सर्व प्रकारच्या प्रतिकारी चळवळींना साहाय्य करणे आणि त्या शोषणाचा अंत करून खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळवून देणे

४. त्यासाठी समाजातील शेतकरी- कष्टकरी लोकांना संघटित करणे.

आरएसएस, हिंदू महासभा तसेच मुस्लिम लीगच्या विचारांमध्ये आणि या क्रांतिकारकांमध्ये जो मूलभूत फरक होता तो हा. त्या धर्मांध संघटनांना समता, स्वातंत्र्य आणि प्रजेचे राज्य आणण्यात रस नव्हता. त्यांना धर्माधिष्ठित राज्य हवे होते मग त्यांचे खालच्या जाती व स्त्रिया यांच्या सामाजिक, आर्थिक शोषणाचे कारस्थान अविरत चालू राहिले असते. तर ही क्रांतिकारक मंडळी लोकांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कटिबद्ध होती. म्हणून भगतसिंगाने अत्यंत सुस्पष्ट शब्दात व नि:संदिग्धपणे लिहिले होते की :

"नौजवान भारत सभा ही संघटना धर्मांधतेला खतपाणी घालणार नाही आणि तशा प्रकारचे धर्मांधतेचे विष लोकांमध्ये पसरवून त्यांच्यात दुही माजविणाऱ्या संघटनांना कधीही मान्य करणार नाही", आणि "धर्म ही खाजगी बाब आहे. संघटनेचे ध्येय हे लोकांमध्ये सहिष्णुता तयार करणे, त्यांनी एकोप्याने व परस्पर सामंजस्याने सहजीवन जगावे असे वातावरण तयार करण्याचे आहे. ही संघटना त्यासाठी आपल्या प्राणांची बाजी लावेल."

भगतसिंगाला भगवे बनविण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि त्यावर आपल्या धर्मांध स्वार्थाची पोळी भाजणाऱ्या अभाविप, विहिंप आणि रास्वसंघ या संघटनांनी खरा भगतसिंग आणि त्याचे खरे विचार किती खोटेपणाने मांडले हे आपण समजून घेतले पाहिजे.

१९२८ला कानपूर येथे कम्युनिस्ट पक्षातर्फे शेतकरी-कष्टकरी वर्गांच्या संघटनांचे जे राष्ट्रीय अधिवेशन झाले त्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरती चालू असणाऱ्या कामगारवर्गीय लढ्यांना पाठिंबा जाहीर करण्यात आला. हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेत आता समाजवादी हा शब्द घालण्यात आला आणि भगतसिंगाने क्रांतीचा जाहीरनामाच सादर केला. त्यात 'क्रांती म्हणजे काय ?' याच्याबद्दल जे विचार मांडले आहेत ते असे:

"क्रांती ही एक नैसर्गिक गोष्ट आहे. क्रांतीशिवाय निसर्ग असो वा मानवी समाज, त्यांच्यात इष्ट असा प्रगतिशील बदल कधीच घडणार नाही. क्रांती म्हणजे रक्तपात वा खूनखराबा नव्हे. चारदोन बॉंब फेकणे वा पिस्तुलाने गोळ्या झाडून काही माणसांचा खातमा करणे म्हणजे देखील क्रांती नव्हे. क्रांती म्हणजे आजपर्यंत मानवजातीने केलेल्या सांस्कृतिक प्रगतीला उद्ध्वस्त करून न्याय आणि समता या तत्त्वांची खुलेआम पायमल्ली करणे व त्यांचे शतश: तुकडे करणे असादेखील मुळीच नाही. क्रांती ही देवकल्पनेच्या विरुद्ध आहे खरी पण ती मानवविरोधी असू शकत नाही. जीर्ण जुन्याच्या विरुद्ध अधिक चांगले नवे, नरकासमान जिण्याच्या विरोधात अधिक मानवी जीवन घडवणे, अंधाराला नष्ट करून नव्या जीवनाचा प्रकाश पाडणे म्हणजे क्रांती. क्रांतीशिवाय जगात समन्वय नाही, प्रेम नाही, एकमेळ नाही. मानवतेचे कवी ज्या स्वातंत्र्याचे जयघोष शतकानुशतकापासून गाताहेत, एकमेळाचे जे दैवी संगीत साऱ्या विश्वात रुणझुणते ते म्हणजे क्रांती! जर क्रांतीतून होणारा बदल या जगातून वजा केला तर कोणते चैतन्य या जगात शिल्लक काय राहील ? क्रांती म्हणजे हा नियम, क्रांती म्हणजे विश्वाचे नियमन आणि क्रांती हेच सत्य!"

"भारत आज साम्राज्यवादी सत्तेच्या गुलामीच्या जोखडाखाली भरडून निघत आहे. भारताची प्रजा आज दारिद्र्य आणि अडाणीपणा यांच्या भक्ष्यस्थानी पडते आहे. परकीय सत्तेचे जोखड आणि आर्थिक शोषण यांनी या देशातल्या कामगार-कष्टकरी शेतकरी वर्गाला कमालीच्या वाईट अवस्थेच्या गर्तेत नेले आहे. भारतीय कामगारांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. एकीकडे परकीय भांडवलाने चालविलेले हल्ले, दुसरीकडे भारतीय भांडवलदारांनी केलेले आघात यांच्या दुहेरी व विश्वासघातकी माऱ्याखाली हा वर्ग भरडून निघत आहे. या देशातील शेतकरी व कामगार वर्गाला जर कोणती आशा असेल तर ती केवळ समाजवादी विचारातच असू शकते. केवळ समाजवादी विचारांमध्येच संपूर्ण स्वातंत्र्य आणि सर्व प्रकारच्या सामाजिक अन्यायांचा खातमा करण्याची शक्ती आहे."

भगतसिंगाचे हे विचार त्याचे समाजवादावरील प्रेम, त्या मार्गानेच कल्याण होईल असा दृढ विश्वास आणि क्रांतीवरील त्याची निष्ठा स्पष्ट करतात.

१९२८मध्ये 'सायमन कमिशन' अधिक घटनात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी भारतात आले आणि देशभर या नव्या साम्राज्यवादी काव्याविरुद्ध असंतोषाचा आगडोंब उसळला. हे कमिशन जेव्हा लाहोरला आले तेव्हा त्याच्याविरुद्ध प्रचंड निदर्शने करण्यात आली. भगतसिंग आणि त्याचे झुंझार साथी यात अग्रभागी होते. लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली हजारो लोक निदर्शने करत असताना स्कॉट या पोलीस सुपरिंटेंडंटच्या आदेशानुसार निदर्शने करणाऱ्या लोकांवर पाशवी लाठीहल्ला करण्यात आला आणि त्यात लाला लजपतरायांचे डोके फुटले आणि काही दिवसांनी मृत्यू झाला. प्रचंड लोकक्षोभ उसळला. त्यांच्या पाशवी खुनाचा बदला घेण्यासाठी या क्रांतिकारकांनी लालांच्या मृत्यूनंतर बरोबर एक महिन्याने पोलिसांवर प्रतिहल्ला केला आणि त्यात स्कॉट समजून त्याच्या बरोबरीने लोकांवर लाठीहल्ला करणाऱ्या जे. पी. सॉन्डर्स या पोलीस अधिकाऱ्यावर गोळ्या झाडून भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, बटुकेश्वर दत्त, राजगुरू आणि सुखदेव यांनी त्याला यमसदनाला पाठविले. लोकांच्या मनातील संतापाला त्यांनी कृतीची दिशा दिली.

यानंतर ब्रिटिश सरकार अगदी चवताळल्यासारखे वागू लागले. ८ एप्रिल १९२९ या दिवशी 'सामाजिक सुरक्षा कायदा' आणि 'औद्योगिक लवाद कायदा' या भारतीय लोकांच्या अधिकारांचा कमालीचा संकोच करणाऱ्या अत्यंत घातकी बिलांना सरकारने असेंब्लीत मांडण्याचे ठरविले. त्याच्या विरोधात भगतसिंग व बटुकेश्वर दत्त या दोन क्रांतिकारकांनी असेंब्लीत बॉंब टाकले. त्यात त्यांचा उद्देश कोणत्याही प्रकारचा हिंसाचार करण्याचा वा जीवितहानी करण्याचा नव्हता. "बहिऱ्या माणसांना आपला आवाज ऐकू जायचा असेल तर मोठा आवाज करावाच लागतो. हे दोन घातक कायदे आणि यापुढे येऊ घातलेला वृत्तपत्रांच्या विरुद्ध राजद्रोहाचा कायदा लागू करणारा कायदा यांना आमचा विरोध आहे; सरकारने कामगारांच्या नेत्यांच्या अटकेचे सत्र सुरू केलेले या साऱ्याविरुद्ध आमचा विरोधी आवाज बहिऱ्या सरकारला स्पष्ट ऐकू जावा यासाठी आम्ही हे स्फोट करत आहोत." असे त्यांनी जाहीर केले. आणि क्रांतीच्या घोषणा दिल्या.

यानंतर सरकारने त्यांना अटक करून खटला दाखल केला. लोकांमध्ये क्रांतीची चेतना पेटली आणि सारीकडे संतापाच्या ज्वाळा उसळू लागल्या. १२ जूनला बॉंबस्फोटाच्या आरोपाखाली त्यांना अंदमानच्या तुरुंगात जन्मठेप फर्मावली आणि १० जुलै १९२९ला सॉन्डर्सच्या खुनाचा खटला चालू झाला व ७ ऑक्टोबर १९३०ला भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशीची सजा सुनावण्यात आली.

भगतसिंग आणि त्याचे सहकारी व भगव्यांचे तथाकथित क्रांतिवीर सावरकर यांच्यात खूप फरक आहे. सावरकरांनी 'मायबाप' ब्रिटिश सरकारला (हा सावरकरांचाच शब्द आहे) २२ माफीपत्रे लिहून दिली, त्यांच्या पायांवर पुन:पुन्हा डोके घासले आणि आपण ब्रिटिश सरकारचे अत्यंत वफादार सेवक असल्याचे, तसे वागण्याचे व पुन्हा चुकूनही ब्रिटिशांच्या

*(पान ९ पहा)*

## *प्रिय प्राध्यापक चिनॉय,*

# कन्नूरमधील ‘हिंसाचारा’बाबतच्या आपल्या पूर्वग्रहदूषित व पक्षपाती दृष्टीकोनामधून कृपया बाहेर या आणि तथ्य जाणून घ्या !

***(‘जेएनयु’ मधील प्राध्यापक कमल मित्र चिनॉय यांच्या केरळचा उत्तरेकडील जिल्हा असलेल्या कन्नूरमधील राजकीय हिंसाचारावरील टोकाच्या पक्षपाती लिखाणाला प्रतिक्रिया म्हणून निथीश नारायण यांनी हे खुले पत्र लिहिले आहे.)***

प्रिय प्राध्यापक कमल मित्र चिनॉय,

मी आपण daily.inमध्ये कन्नूरमधील राजकीय हिंसाचाराबद्दल लिहिलेल्या ‘केरळ आरएसएस आणि माकपची रक्तरंजित लढाई संपवत का नाही ?’ ह्या शीर्षकाचा लेख वाचला. ह्या लेखाने वस्तुस्थितीकडे केलेल्या पूर्ण दुर्लक्षामुळे मी हादरून गेलो. काही कॉर्पोरेट माध्यमांनी रंगवलेले कन्नूरचे चित्र आणि आपण लिहिलेल्या उपरोल्लेखित लेखातील लिखाण यात मला काहीच फरक आढळून आला नाही. त्या जिल्ह्यात वाढलेली आणि संघ ब्रिगेडकडून होणाऱ्या शारीरिक हल्ल्यांना आणि खुनाच्या धमक्यांना सामोरे जावे लागलेली एक व्यक्ती म्हणून मला आपल्या काही तर्क, वितर्कांना प्रतिक्रिया देणे भाग आहे.

आपण हिंसेच्या कारणांबद्दल दिलेल्या, संघाच्या स्क्रीप्टमध्ये चपखलपणे बसणाऱ्या निराधार, पक्षपाती आणि धादांत खोट्या तर्कांची मांडणी पाहून आपला एक माजी विद्यार्थी म्हणून मी खूपच अस्वस्थ झालो. मला आशा आहे की, भविष्यात आपण कन्नूरला प्रत्यक्ष भेट देऊन तिथल्या खऱ्या परिस्थितीमधून काही तथ्य गोळा कराल. मी पुन्हा नमूद करतो की, आपल्या लेखात वर्णन केल्याप्रमाणे कन्नूर काही ‘अंध:कारमय क्षेत्र’ नाही. मी हे विश्वासाने सांगू शकतो की कन्नूर इतकी सार्वजनिक वाचनालये असणारा दुसरा जिल्हा आपल्याला ह्या देशात आढळणार नाही. तितक्याच विश्वासाने मी हे देखील सांगू शकतो की आपल्याला इथल्या प्रत्येक मोहल्ल्यातील कला मंच किंवा सांस्कृतिक मंचांची संख्या आणि त्यांच्या सक्रियतेमधील चैतन्य पाहून आश्चर्य वाटेल.

कन्नूर हे देशातील असे ठिकाण आहे जिथे सहकाराच्या रूपातील सामूहिक, सामाजिक उद्योजकतेमुळे लोकांना फार मोठ्या संख्येने रोजगार पुरवला गेला आहे. मला हे देखील नमूद करू द्या की, आपण हे देखील सिद्ध करू शकणार नाही की, कन्नूर सर्वात जास्त राजकीय हत्या होणारा जिल्हा आहे. आपल्याला कोण ही माहिती पुरवत आहे याची मला कल्पना नाही. आपण उजव्या शक्तींच्या हातातल्या कॉर्पोरेट माध्यमांमधून मिळालेल्या माहितीवर विसंबून राहू इच्छित आहात की काय ?

असो, आपण काही दिवस कन्नूरमध्ये घालवलेच पाहिजेत. एक राजकीय अभ्यासक आणि शांतताप्रिय माणूस ह्या दोन्ही पातळ्यांवर एक आश्चर्यचकित करणारा अनुभव मी आपल्याला देऊ इच्छितो. हा अनुभव अवश्य घेऊन पहा, यातून काही हानी झालीच तर ती आपल्या पूर्वग्रह आणि पक्षपातीपणालाच होईल. इथे मी फक्त आपल्या लेखात आपण दिलेल्या दूषणांची तर्कहीनता दाखवू इच्छितो.

लेखातील उपशीर्षकात आपण लिहिता की एकदा का सत्य बाहेर आले की देशातील अनेक लोक बुचकळ्यात पडतील की हे सर्व इतका काळ चालू कसे राहू शकले. जर आपल्यासारखी महान योग्यतेची व्यक्ती ह्या गोष्टी अशा प्रकारे सादर करत असेल तर देशाला सत्य समजायला किती काळ जावा लागेल. सुदैवाने, कन्नूरमध्ये राहणारे आमच्यासारखे लोक स्वत:च्या जीवनावरून परिस्थितीचे मूल्यांकन करतात, आपल्यासारख्यांनी काचेच्या घरात बसून लिहिलेल्या सिद्धांतांची वाट पहात बसत नाहीत.

आपल्या पहिल्याच विधानात आपण उजव्या शक्तींच्या तर्कांची पुनरोक्ती करता की, डाव्या लोकशाही आघाडीचे शासन असो वा संयुक्त लोकशाही आघाडीचे, समाजकल्याणकारी व्यवस्था त्याच स्वरूपात चालू ठेवली जाते आणि गरिबांची जगण्याची परिस्थिती सुधारण्याचे सारखेच प्रयत्न केले जातात ! आपल्याला असे वाटत नाही का, की असे सरसकट विधान करून आणि डाव्या, उजव्यांच्या गरिबांची जगण्याची परिस्थिती सुधारण्याबाबतच्या भूमिकांना एकाच पारड्यात तोलून आपण समान अधिकार आणि आत्मसन्मान मिळवण्यासाठीचे शेतकऱ्यांचे लढे आणि कम्युनिस्ट चळवळी यांनी ठासून भरलेल्या केरळच्या इतिहासावर अन्याय करत आहात. मला वाटले होते की आपल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षातील सहभागाने तरी आपल्याला जमीन सुधार आणि शिक्षण विधेयकांबाबत किमान काही शिक्षण दिले असेल. नारायण गुरु, अय्यंकली, पोयकायिल अप्पाचन इत्यादींच्या सामाजिक सुधारणेच्या चळवळी पुढे चालू ठेवण्याची हमी कम्युनिस्टांनी कशा प्रकारे घेतली याबद्दल आपल्याला काहीच कल्पना दिसत नाही. आपल्या समकालीन अभ्यासकांच्या लिखाणाचे आपण वाचन करायला पाहिजे इतकीच इच्छा मी दर्शवू शकतो. भाकपमधल्या आपल्या सहकाऱ्यांचे देखील काही वेगळे मत असेल असे मला वाटत नाही.

कन्नूरमधल्या बहुचर्चित ‘हिंसाचारा’च्या पार्श्वभूमीची पाळेमुळे शोधायचा आपण कधी प्रयत्न केला आहे काय ? इतिहासात हे सर्व अचानकपणे एका क्षणात घडले आहे काय ? जर तसे असेल तर फक्त कन्नूरलाच का ? ह्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध आपल्याला साठच्या दशकाच्या उत्तरार्धात घेऊन जाईल, जेव्हा संघ परिवाराने मंगळुरूस्थित गणेश बिडी कंपनीच्या मालकाच्या रखवालदारांच्या रूपात कन्नूरला प्रवेश केला. अत्यंत कमी मोबदल्यावर राबणाऱ्या ह्या बिडी कामगारांसाठी कल्याणकारी निधी उभारण्याच्या ईएमएस नंबूद्रीपाद सरकारच्या निर्णयामुळे कंपनी वैफल्याने ग्रस्त झाली होती. कम्युनिस्टांनी संघटित केलेले कामगार आपले हक्क

मिळवून घेण्यासाठी ठामपणे लढत होते. त्यामुळे चिडलेल्या मंगळुरूच्या ह्या कंपनीने, लढणाऱ्या कामगारांवर हल्ले करण्यासाठी त्यांच्या गुन्हेगारी टोळीला तिथे पाचारण केले. त्यांनी मालकाच्या तालावर नाचणारी दुसरी युनियन तयार करून कामगारांची एकजूट भंग करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी डाव्या कामगार संघटनेच्या सदस्यांना कामावरून देखील काढले. गरीब कामगारांची जगण्याची परिस्थिती अजूनच कमजोर होऊन त्यांनी मालकासमोर गुडघे टेकावेत यासाठी त्यांनी कंपनी काही काळासाठी बंद देखील केली. परंतु कम्युनिस्ट पक्षाने संघ परिवाराचे सगळे आडाखे खोटे ठरवून दिनेश बिडी या नावाच्या एका सहकारी तत्त्वाने चालणाऱ्या कंपनीची स्थापना केली. यामुळे गणेश बिडी कंपनी अजूनच चिडली आणि त्यांनी कम्युनिस्ट पक्षाबरोबर असलेल्या बिडी कामगारांवर शारीरिक हल्ले करण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांना पाठवले. बिडी कारखान्यांवर वारंवार हल्ले केले गेले.

मुंबई, ईटली किंवा जर्मनीत घडल्याप्रमाणे संघ परिवाराच्या फॅसिस्ट शक्तींनी देखील सर्वप्रथम कामगार संघटनांमधल्या कामगारांच्या एकजुटीवर हल्ले केले. कामगार संघटनांची ताकद खच्ची करण्याच्या पहिल्याच प्रयत्नाला प्रतिरोध झाला. नंतर त्यांनी आपले हातपाय पसरवण्यासाठी जातीय हिंसाचार भडकवण्याचा प्रयत्न केला. ह्याच प्रयत्नात त्यांनी थाल्लीस्सेरी येथे मुसलमानांविरुद्ध घृणा पसरवून दंगली पेटवण्याचे नियोजन केले. आरएसएसचा फूटपाड्या धर्मांध अजेंडा हाणून पाडण्यासाठी आता मुख्यमंत्री असलेल्या पिनरायी विजयन यांच्या नेतृत्वाखाली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने निभावलेली भूमिका समजून घेण्यासाठी आपल्याला ह्या दंगलींची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या न्यायमूर्ती विथयथील आयोगाच्या अहवालाची प्रत मिळवायला हवी.

एका मशिदीचे रक्षण करताना माकपचे शाखा सचिव युके कुन्हीरामन यांना आरएसएसच्या लोकांनी कसे ठार मारले हे देखील आपण जाणून घेतले पाहिजे. फॅसिस्ट शक्तींनी जिथे जिथे प्रवेश करण्यासाठीचे नियोजन केले तिथे कशा प्रकारे जातीय हिंसाचाराचे थैमान घातले गेले हे आपण पाहिले पाहिजे. कन्नूरमध्ये ह्याच प्रवृत्तींशी माकपच्या कार्यकर्त्यांनी लढा दिला आणि त्यांना परास्त केले. त्या विभागात प्रवेश करण्याच्या अशा दोन वेगवेगळ्या योजना अपयशी झाल्यावर आरएसएसने त्या जिल्ह्यातील माकपच्या कार्यकर्त्यांचा शारीरिक अंत करण्याची योजना आखली आणि आजही ती तशीच चालू ठेवली आहे.

गुजरातमधील आरएसएसच्या शाखांची संख्या आपल्याला माहित असेलच. ती १८०० पेक्षा कमी आहे. देशातील सर्वात मोठ्या राज्यांपैकी एक असलेल्या उत्तर प्रदेशात आरएसएसच्या ४००० हून कमी शाखा आहेत. कर्नाटकात ३००० हून कमी आहेत. ह्या सर्व राज्यांमधली त्यांची गुन्हेगारी स्वरूपाची भूमिका, त्यांनी घडवून आणलेले नरसंहार, भडकवलेल्या दंगली आठवतायत ना?

आपल्याला माहित आहे, केरळसारख्या छोट्याशा राज्यात त्यांच्या किती शाखा आहेत? ४५०० पेक्षा जास्त! ही आहे त्यांची संघटनात्मक ताकद, जी त्यांनी केरळच्या सामाजिक जीवनात घुसखोरी करण्याच्या नियोजित षडयंत्राद्वारे गेल्या काही दशकांमध्ये वाढवलेली आहे. एक गंभीर राजकीय विश्लेषक म्हणून आपण आरएसएस, संघ परिवाराची एखादी संघटना उभी करण्यासाठी किती योजना आखते आणि किती लक्ष केंद्रीत करते ह्याचा अभ्यास केलाच असेल. अजूनही त्यांना केरळमध्ये गुजरातसारखा नरसंहार करता आलेला नाही. जे त्यांनी कंधमाल किंवा कर्नाटकातील वेगवेगळ्या भागात केले ते केरळमध्ये करण्यात त्यांना अपयश आले आहे.

मागच्या लोकसभा निवडणुकांच्या आधी उत्तर प्रदेशात दंगे झालेले आणि त्यानंतर भाजपने मोठ्या प्रमाणात जागा निवडून आणल्याचेही आपण पाहिले आहे. इतकी संघटनात्मक ताकद लावूनही केरळमध्ये अजूनही जातीय तणाव निर्माण करून शक्ती वाढवण्याच्या संघाच्या नियोजनाला म्हणावे तितके यश आलेले नाही. संघाने राज्यात जातीय ध्रुवीकरण करण्याचे व सामाजिक वीण उखडण्याचे जे वेगवेगळे प्रयत्न चालवलेले आहेत त्याचा अभ्यास केल्यावर आपल्या लक्षात येईल की ह्या काही 'निष्पाप' घडामोडी नाहीत. मला ह्याच्यावर एखादे दीर्घ टिपणही लिहिता आले असते.

केरळमधील आरएसएस हा काही देशातील अन्य भागातल्या त्यांच्या शाखांपेक्षा भिन्न प्रकार नाही. ते सर्व ठिकाणी एकाच प्रकारची आक्रमक रणनिती आखतात. ह्या सर्व प्रयत्नांना केरळमध्ये प्राण पणाला लावून प्रतिकार केला जात आहे व त्यांना परास्त केले जात आहे. राज्याच्या सामाजिक व्यवस्थेचे सारथ्य करायचा संघ परिवाराचा अजेंडा रोखण्यातील माकपच्या नेतृत्वाखाली डाव्यांची भूमिका नाकारू शकत नाही. मला आशा आहे की आपण हे मान्य कराल की केरळचे सामाजिक वातावरण हिंसक नाही.

केरळमध्ये सत्तेत असणाऱ्या आणि सर्वात जास्त ताकद असलेल्या पक्षाचे चरित्र जर हिंसक असते तर केरळचे रूपांतर खूप अगोदरच युद्धभूमीत झाले असते. पण मग आरएसएसचा प्रवेश झाल्यावरच दोघांकडून रक्तपात आणि हत्या का होत आहेत? ह्या प्रश्नाचे उत्तर कन्नूरमधील 'टोळीयुद्ध' असे साध्या सरळ शब्दात देता येणार नाही. ह्याचा संबंध 'जनुकशास्त्रा'शी नाही पण राजकारणाशी मात्र नक्कीच आहे. त्यासाठी आरएसएसने देशाच्या विविध भागांमध्ये कशी घूसखोरी केली ह्याचा अभ्यास करून मगच कन्नूरशी त्याची तुलना करावी. माझी अशी प्रामाणिक इच्छा आहे की आपले राज्यशास्त्राचे अभ्यास आणि संशोधन तर्कविहीन तुलना आणि निवडक स्मृतीभ्रंशाच्या पलिकडे जाऊन त्या पातळीपर्यंत जाईल.

दुसऱ्या एका भागात आपण म्हटले आहे की माकप आणि आरएसएसने इतरही राज्यांमध्ये राजकारण केले आहे. तिथे जर काही हत्यांचे प्रकार झाले तर कायद्याने हस्तक्षेप केला आहे. असे वाटते की, कन्नूरमध्ये माराकाटी करण्याची खुली सूट आहे. असे काही विधान करण्यापूर्वी किमान गुन्ह्यांची किंवा राजकीय हत्यांची आकडेवारी तरी लक्षात घ्यायला हवी होती.

जनतेतील प्रभाव, विधानसभेतील जागा आणि संपूर्ण केरळमध्ये अतिशय व्यापक असे संघटनात्मक अस्तित्व ह्याचा विचार करता माकप सर्वात मोठा राजकीय पक्ष आहे. कन्नूर हा सर्वात मोठा गड आहे, ज्यात त्यांना ५४% मते मिळाली होती. निवडणुकीचे रिंगण असो वा सामाजिक जडणघडणीवर प्रभाव असो, या दोन्हीतही आरएसएसची बाजू लंगडी आहे. पण त्यांच्याकडे मजबूत संघटनात्मक यंत्रणा आहे. केरळमध्ये घुसण्यासाठी हिंसक कारवायांचा वापर करण्यापासून स्वत:ला रोखण्याचा आरएसएसने उच्च स्तरावर निर्णय घेणे यापेक्षा ह्याचा वेगळा शेवट होऊच शकत नाही.

आपल्याला असे खरोखर वाटते का की, ह्या प्रकारचे राजकारण फक्त कन्नूरमध्ये होते? की आपले असे मत आहे की, अशा प्रकारच्या

अन्य राज्यांमधील घटनांमध्ये कायदा हस्तक्षेप करतो आहे. गुजरातमध्ये कायद्याचे काय स्थान होते हे विसरून जाण्यासाठी १५ वर्षांचा काळ पुरेसा नाही. अशी बेजबाबदार टिप्पणी आपण दुरुस्त कराल अशी आशा आहे. आपण असाही विचार करता कामा नये की जे तुम्हाला जाणवत नाही किंवा तुमच्या विवेकाला हलवत नाही, ते घडतच नाही. कर्नाटकात मंगळुरू येथे संघाच्याच कार्यकर्त्यांनी, एका हिंदू जागरण वेदिकेच्या कार्यकर्त्यासहित १३ संघ परिवारातील कार्यकर्त्यांच्या हत्या केल्या. माझ्याकडे संघ परिवाराने त्यांच्या स्वत:च्याच सहकाऱ्यांविरुद्ध केलेल्या भीषण अत्याचारांच्या घटनांची पूर्ण यादी आहे. देशाची सामूहिक विवेकशक्ती जागृत करण्यासाठी किती काळ जावा लागणार आहे कुणास ठाऊक ?

पुढील गोष्ट नमूद करून मला समारोप करू द्या. आपल्या विधानात अजून एक घातक मुद्दा म्हणजे 'निष्पाप' अशी प्रतिमा सादर करणे. एका शिक्षकाचा त्याच्या वर्गात भोसकून केलेल्या हत्येचा उल्लेख आपण केला आहे. ह्या रानटी घटनेबाबत कुणी निंदा केली तर मला त्याबाबत आक्षेप असण्याचे कारण नाही. सर्व राजकीय हत्यांचा, त्यात गुंतलेल्या पक्षांचा विचार न करता निषेधच केला पाहिजे. पण जाणून बुजून आणि निवडून पसरवलेल्या बातम्यांवर अवलंबून राहून आपल्यासारख्या लोकांनी स्वत:ला त्यात अडकवून घेऊ नये.

के.व्ही. सुधीश नावाच्या विद्यार्थी नेत्याला त्याच्या घरात, त्याच्या आईवडिलांसमोर भोसकून मारले जाते, हे उदाहरण आपल्या मनात का आले नाही ? आरएसएसच्या गुंडांनी त्याच्या शरीराचे इतके तुकडे केले होते की, त्याचे पोस्टमॉर्टेम करणारे डॉक्टर म्हणाले की, त्याच्या जखमांत एक एक वीट मावू शकली असती, इतक्या त्या मोठ्या होत्या.

जवळच्याच जिल्ह्यात आरएसएसचा कार्यकर्ता असलेल्या एका हिंदू धर्मांधाने ८ वर्षांच्या फहादची हत्या केली. माझ्या दोन जिवलग मित्रांच्या वडिलांचा मृत्यू आरएसएसने केलेल्या हल्ल्यात झाला. आपण माझा मित्र धनराज याचाही उल्लेख करणार नाही, ज्याची काही महिन्यांपूर्वी त्याच्या पत्नीसमोर हत्या करण्यात आली. आपण ज्या दिवशी लेख लिहिला त्याच दिवशी अलपुझ्झामध्ये मुहसीन नावाच्या डीवायएफआयच्या मुस्लीम कार्यकर्त्याची हत्या करण्यात आली.

दुसऱ्या एका धक्कादायक घटनेत त्रिशूरमध्ये भाजपच्या निर्मल नावाच्या कार्यकर्त्याची हत्या भाजपच्याच एका कार्यकर्त्याने केली. ह्या हत्येनंतर भाजपने माकपविरुद्ध हरताळ पुकारला ! काही दिवसांपूर्वी आरएसएसचा एक शारीरिक शिक्षण प्रमुख असलेल्या विष्णूने उघडपणे सांगितले की त्याने स्वत:च्या संघटनेच्या खुनी कारस्थानांबाबत बोलू नये म्हणून त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्याला आरएसएसने ३८ दिवस ओलीस ठेवून त्याचा अनन्वित छळ केला. त्याच्याकडून माकपचे नेते, कन्नूर जिल्हा सचिव, त्याच्या मृत्यूला जबाबदार असल्याची आत्महत्येची चिठ्ठी जबरदस्तीने लिहून घेतली गेली. भगव्या पलटणीच्या अंतर्गत काय चाललय ? हे जाणून घेण्यासाठी आपण त्याच्याशी अवश्य बोलू शकता.

ही यादी कधीच संपणार नाही. मला फक्त इतकेच सांगायचे आहे की, राजकारणात हिंसेला अजिबात स्थान असता कामा नये. पण आपण हा निष्कर्ष काढता कामा नये की हिंसा तेव्हाच होते जेव्हा दोन्ही पक्षांचा त्यात हात असतो. आपण किमान आरएसएसच्या इतिहासात तरी डोकावले पाहिजे आणि गोळवलकर त्यांच्या 'विचारधन' पुस्तकात कम्युनिस्टांबद्दल ते काय म्हणतात ते वाचले पाहिजे. माझे म्हणणे संपलेले नाही, पण मी इथे थांबतो. आणि आपल्याला जर ह्याला उत्तर द्यावेसे वाटले तर यावरच्या तपशीलवार चर्चेचे मी स्वागतच करेन. किंवा भगव्या नरकाची तळघरे उघडकीस आणण्यासाठी आपण संयुक्त प्रयत्न का करू नयेत ?

★ ★ ★

## (भगतसिंग आणि क्रांतिकारक... पान ६ वरून)

विरोधात ब्रही न काढण्याचे लेखी आश्वासन दिले. याच्या उलट भगतसिंगाने काय केले ? आपल्या शिक्षेमुळे व्याकुळ झालेल्या आईबापांच्या आर्जवांना बळी न पडता त्यांनी आपण ब्रिटिश सरकारला अजिबात धूप घालत नसल्याचे जाहीररीत्या स्पष्ट केले. "आम्ही जुलमी ब्रिटिश सरकारविरुद्ध स्वातंत्र्यासाठी युद्ध पुकारले आहे त्यामुळे आम्हाला खुशाल शिक्षा करावी; इतकेच नव्हे तर आम्हाला युद्धात सैनिकांना घालतात तशा गोळ्या घालून सजा द्यावी असे आव्हानच त्यांनी सरकारला दिले.

कुठे ब्रिटिश सरकारचे दयेसाठी पाय चाटणारे सावरकर आणि कुठे भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्यासारखे ज्वलंत क्रांतिकारक ! कुठे माफीपत्र लिहिणारे पळपुटे 'वीर' आणि कुठे देशासाठी हसतहसत प्राणांची आहुती देणारे भगतसिंग आणि त्याचे साथी ! त्यांच्यात तुलना तरी शक्य आहे काय ? या क्रांतिकारकांना फाशी देण्यात आली त्या दिवशी भगतसिंग शांतपणे लेनिनचे चरित्र वाचत होता. साम्राज्यवाद आणि ब्रिटिश सरकारच्या विरोधात घोषणा देत देत, क्रांतीचा जयजयकार करीत हे क्रांतिकारक आपल्या अखेरच्या प्रवासाला निघाले. साऱ्या देशाच्या काळजात जणू दु:खाचा भाला खुपसला गेला. फाशीच्या तख्तावर चढताना त्यांच्या ओठांवर होत्या या ओळी : ''दिलसे निकलेगी ना मरकर भी वतनकी खुशबू / मेरी मिट्टीसे भी खुशबू-ए-वतन आएगी !''

(मला खुशाल फासावर लटकवा. पण माझ्या रक्तात दरवळणारा माझ्या देशाच्या मातीचा सुगंध कदापिही जाणार नाही. माझ्या मृत्युनंतर देहाच्या मातीतूनदेखील तो सुगंध दाही दिशांमध्ये दरवळत राहील !)

एकीकडे बाजारात स्वातंत्र्य आणि लोकशाही अधिकार लिलावात काढणारे हे 'नमो सरकार' आणि दुसरीकडे त्यांच्या भगव्या फौजेने चालू केलेला जनविरोधी, फूट आणि दुही माजविणारा जुलूम; एकीकडे जागतिकीकरणाच्या नावाखाली चाललेली शेतकरी कामगारांची, दीनदुबळ्यांची दिनदहाडे होणारी लूट तर दुसरीकडे 'नोटाबंदी'सारखा कष्टकऱ्यांचा, त्यांना देशोधडीला लावणारा 'विकास'; एकीकडे योगी असणारे भोगी मुख्यमंत्री आणि त्यांचा हिंसेला खतपाणी घालणारा व्यवहार तर दुसरीकडे लव्ह जिहाद आणि हिंदू स्त्रियांना त्यांच्या गर्भाशयाच्या मापात मोजणारे धर्मांध यांच्या कात्रीत सापडलेली जनता यांच्या संघर्षात आपण कोणता मार्ग चोखाळावा हे आपण ठरवायचे आहे. खरी क्रांती आणि बदल म्हणजे या राक्षसी बेलगाम सरकारच्या धर्मांध फौजेला कोणीतरी समजून सांगण्याची गरज आहे ! भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू या क्रांतिवीरांनी दाखवून दिलेला मार्ग अधिक निडरपणाचा, धैर्याचा आणि केवळ भारतालाच नव्हे तर सर्व शोषितांच्या कल्याणाचा आणि आख्ख्या मानवजातीलाच श्रेयस्कर ठरेल असा नाही काय ?

★ ★ ★

# स्मशान आणि कब्रस्थान

**सुभाष थोरात**

आरएसएसचा पर्यायाने पंतप्रधान मोदींचा मुस्लीमद्वेषी इतिहास नवा नाही. ज्याचे अनेक दाखले देता येतील. गांधी हत्या ते गुजरात नरसंहार ही त्याची गंभीर उदाहरणे आहेत. हिंदू महासभेचे सावरकर आणि आरएसएसचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांनी सैद्धांतिक पातळीवर या मुस्लीम द्वेषाची ठोस मांडणी करून ठेवली आहे. एकंदर ही सर्व मुस्लीमद्वेषाबरोबरच कम्युनिस्ट आणि दलितद्वेषी आहे. मोदी सरकारच्या गेल्या तीन वर्षाच्या कालखंडात उच्च शिक्षणातून दलित, आदिवासी, ओबीसी यांना हाकलून लावण्याची मोहीम, ज्यात अतिशय हुशार विद्यार्थी असलेल्या रोहित वेमुलाची संस्थात्मक हत्या, जेएनयूमध्ये मुस्लीम, दलित आणि कम्युनिस्ट विद्यार्थ्यांना टार्गेट करून त्यांच्यावर देशद्रोहाचे आरोप लावण्यापर्यंत मजल. गोमांस, गोहत्येचा मुद्दा करून अखलाख याची हत्या, आणि गुजरातमध्ये दलितांना अमानुष मारहाण, या सर्व घटना सावरकर आणि गोळवलकरप्रणीत कथाकथीत हिंदू राष्ट्र, खरे तर ब्राह्मण्यवादी राष्ट्र बनवण्याच्या षडयंत्राचा भाग आहेत. विचार स्वातंत्र्याच्या विरोधी घटना आहेतच.

ज्या महात्मा गांधींना आपण राष्ट्रपिता म्हणतो त्या गांधींची हत्या संघाच्या स्वयंसेवक असलेल्या नथुरामने केली. त्यावेळी आरएसएसच्या लोकांनी आनंद व्यक्त केला, साखर वाटली, असे खुद्द वल्लभभाईंनी त्यांच्या पत्रात लिहिले आहे. आज राष्ट्रभक्तीचा ठेका घेतल्याच्या थाटात ते देशभक्त आणि देशद्रोही अशी जी विभागणी करतात त्यांचा स्वातंत्र्य लढ्यातील इतिहास मात्र विश्वासघाताचा होता. खुद्द गोळवलकर गुरुजींनी स्वातंत्र्य चळवळीचा घात करणारी भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. ''इंग्रज आपले शत्रू नाहीत. खरे शत्रू मुस्लीम आहेत. सबब इंग्रजांविरुद्ध लढण्यात शक्ती वाया घालवू नका'' असे स्पष्ट लिहिले आहे. गांधी हत्येची अनेक कारणे सांगितली जातात आणि नथुरामचे हे कृत्य जणू राष्ट्रभक्तीच आहे, असे उघडपणे सांगितले जाते. मोदी सरकार सत्तेवर आल्यावर तर नथुरामचे मंदीर उभारण्याची घोषणा झाली आहे. पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचा गांधींचा आग्रह होता म्हणून त्यांची हत्या झाली, असे कारण नथुरामचा भाऊ गोपाळ गोडसेने आपल्या पुस्तकात लिहिले आहे. पण खरे कारण ते नाहीच. कारण सुप्रसिद्ध पत्रकार जगन फडणीस यांनी या संदर्भात जे पुस्तक लिहिले आहे, त्यात त्यांनी गांधीहत्येची संपूर्ण वस्तुस्थिती समोर आणली आहे. १९३५ सालापासून गांधी हत्येचे प्रयत्न केले गेले आहेत. एकंदर सहा वेळा गांधींची हत्या करण्याचे प्रयत्न झाले. त्यावेळी पाकिस्तानच्या निर्मितीचीही फार चर्चा झाली नव्हती. गांधी हत्या यासाठी केली गेली ती म्हणजे गांधींची हिंदू धर्माबद्दलची भूमिका, धर्मनिरपेक्ष राज्याला असणारा त्यांचा निर्भेळ पाठिंबा. आंतरजातीय लग्नाबद्दलचा आग्रह, तसेच राज्य घटना समितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घेण्याचा त्यांचा आग्रह, हिंदू-मुस्लीम एकतेची भूमिका, मुस्लीमांकडे भारतीय म्हणून पाहणे, ते स्वत:ला सनातनी हिंदू म्हणवून घेत असले तरी त्यांनी आयुष्याच्या अखेरीस हिंदू धर्माचा जो अन्वयार्थ लावला तो ब्राह्मण्यवाद्यांना पेलणारा नव्हता. या सगळ्या कारणांची गोळाबेरीज केली तर गांधी हत्या का झाली ? याचा शोध लागतो. अर्थातच सनातन वैदिक धर्माची महती गाणाऱ्या ब्राह्मण्यवादी विचारधारेला तिच्या आड येणाऱ्या अवैदिकांच्या हत्या करण्यात आपण काही तरी पुण्य करतो आहोत असेच वाटत आले आहे. चार्वाक ते तुकाराम आणि गांधी ते कलबुर्गी हा तर उघड पुरावा आहे. पण उकळत्या तेलात डोकं बुडवून मारलेले जैनमुनी तसेच बौद्ध भिख्खू आणि वीरशैवांच्या अमानुष कत्तली इतिहासात नमूद आहेत.

आज हे सगळं लिहिण्याचे कारण म्हणजे लोकसभेप्रमाणेच उत्तर प्रदेशात धार्मिक ध्रुवीकरण आणि जातीबेरजेचे राजकारण करून भाजपने जिंकलेली निवडणूक आणि मुख्यमंत्री म्हणून एका धार्मिक महंताची केलेली निवड. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांचे हे उघड मिलन राज्य घटनेच्या धर्मनिरपेक्षतेच्या गाभ्याला-सुरुंग लावणारे आणि भाजप-संघ परिवार यांची पुढील कत्तलखोर दिशा दर्शवणारे आहे. लोकसभेच्या निवडणुकीत संपूर्ण भारतभर आणि विधानसभेच्या निवडणुकीत उत्तर प्रदेशात धार्मिक ध्रुवीकरणाची भूमिका भाजपने घेतली. कैराना आणि मुजफ्फरनगरमधील दंगली, लव्ह जिहाद, रामजादे-हरामजादे, अशा अनेक मोहीमा संघटीत करून हे ध्रुवीकरण करण्यात आले. आज मुख्यमंत्री म्हणून निवड झालेले योगी आदित्यनाथ या मोहिमांत आणि अशी वादग्रस्त वक्तव्ये करण्यात आघाडीवर होते. आज त्यांच्या मतदारसंघात मुस्लीम जनतेला डिसेंबर २०१७ पर्यंत पाकिस्तानात निघून जाण्याची पोस्टर्स लावलेली आहेत. याचा अर्थ काय होतो. २०१९ची निवडणुकही याच मुद्यावर लढण्याची ही तयारी आहे. कारण ते फक्त विकासाची भाषा करू शकतात. विकास करू शकत नाहीत. कारण त्यांची धोरणे गरीबांच्या विकासाची नाहीतच. पुढील लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राममंदिराचा मुद्दा पुढे येईल आणि ध्रुवीकरणासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण केली जाईल हे उघड आहे. पण आपला मुद्दा या ध्रुवीकरणापेक्षाही मोठा आणि गंभीर आहे आणि तो आहे, एका समुदायाला वगळण्याचा, त्यांची कोंडी करण्याचा.


उत्तर प्रदेशात १८% लोकसंख्या असलेल्या आणि भारतात १२% लोकसंख्या असलेल्या मुस्लीम समुदायाला वगळण्याची भाजपची कृती; हिटलरने जर्मनीत ज्यू समुदायाच्या केलेल्या कोंडीसारखी आहे. स्वत:ला राष्ट्रीय पक्ष म्हणवून घेणारा तसेच राज्य घटनेच्या नियमांच्या बंधनात काम करण्याची शपथ घेणारा भाजपसारखा सत्ताधारी पक्ष-केवळ धर्माने जे वेगळे आहेत अशा भारतीय नागरिकांना जाणीवपूर्वक राजकीय प्रक्रियेतून वगळतो. त्यांचे संसदीय मूल्य शून्य करण्याचे राजकारण खेळतो तो त्यांचा विकास करणार आहे काय ? इतर राजकीय पक्षांनी मुस्लीम तुष्टीकरणाची भूमिका घेतल्याचा आरोप करीत–त्यामुळे हिंदूंवर अन्याय झाल्याचा आरोप करीत-सत्तेवर आलेला हा पक्ष मुस्लीम जनतेच्या स्थितीबद्दल सच्चर आयोगाने जे निष्कर्ष काढले आहेत त्याकडे पूर्ण कानाडोळा करतो. कारण मुस्लीमांचे जर तुष्टीकरण होत असेल तर त्यांची सच्चर आयोगाने अधोरेखित केलेली दयनीय परिस्थिती कशी राहीली असती. पण सत्याकडे डोळेझाक करणे हे तर फॅसिस्ट विचारधारेचे लक्षण आहे. आधार नसलेल्या गोष्टींचे भावनिक राजकारण उभे करून एका समुदायाला लक्ष करणे हेच फॅसिस्ट राजकारण असते. जे हिटलर आणि मुसोलीनीने केले. आरएसएसचे हेच तर आदर्श आहेत.

लोकसभा आणि उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीत भाजपने एकही मुस्लीम उमेदवार उभा केला नाही. याचा अर्थ काय होतो, याचा अर्थ होतो त्यांच्यावर अलिप्तपणे दुय्यम नागरीकत्व लादणे, देशाबद्दल त्यांच्यात उपरेपणाची भावना निर्माण करणे आणि शेवटी चिडून, वैतागून, या समुदायाने काहीतरी अतिरेकी कृती करावी जेणे करून सत्तेचे बळ वापरून त्यांना नेस्तनाबूत करता येईल. इतकेच नव्हे तर मुस्लीम जनतेच्या हक्कांची बाजू घेऊन लढणाऱ्या आपल्यासारख्या पक्षांना, त्यांच्या नेत्यांना आणि इतरही पुरोगामी समाजसुधारकांना, 'पाकिस्तानात पाठविण्याची भाषा केली जाते' याचा अर्थ आम्ही सांगू ते भारतीय, बाकीचे देशद्रोही. 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' ही सावरकरप्रणीत हिंदू राष्ट्रवादी भूमिका या मागे कार्य करीत आहे. आरएसएसची भूमिका या भूमिकेपेक्षाही जास्त कडवी आहे. अशाच गोष्टी यादवीला जन्म देतात. जगभर या प्रवृत्ती वाढत आहेत. भांडवलशाही आपल्या अंतर्विरोधाच्या गाळात जसजशी अधिकाधिक रुतत आहे. तशी तशी ती या शक्तींना बळ पुरवित आहे. आज सगळे भांडवलदार, त्यांची प्रसारमाध्यमे मोदींच्या आणि आरएसएसच्या मागे उभी आहेत ती यासाठीच.

अर्थातच आपल्यासमोर सर्वच आघाड्यांवर 'युद्ध' करण्याची परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर एक कडवा हिंदुत्ववादी महंत उत्तर प्रदेशाचा मुख्यमंत्री झाला आहे. उत्तर प्रदेशात हिंदुत्ववादी पाठशाळा ठरणारे अनेक मठ आता उघडले जातील. धर्माच्या नावावर आता अनेक गोरखधंदे सुरू होतील. प्रत्येकाला आपआपल्या जातीची पायरी दाखवली जाईल. व्यवहारात हेच होईल. नुसरत फतेह अलीखान यांची 'तु एक गोरख धंधा है' ही सुफी कव्वाली खूप गाजलेली आहे. ज्यात त्यांनी देवाला अनेक प्रश्न विचारले आहेत, देवाच्या अस्तित्वाबद्दल शंका - उपस्थित केल्या आहेत आणि अखेर 'तू एक गोरख धंदा'आहेस, असा निष्कर्ष काढला आहे. गोरखपुरच्या मठातील हा योगी महंत उत्तर प्रदेशात विकासाचा की धर्माचा कसला गोरखधंदा करतोय ते येणाऱ्या काळात दिसून येईलच. परंतु एक गोष्ट निश्चित आहे ती म्हणजे पंतप्रधान मोदींनी उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत केलेले धार्मिक ध्रुवीकरणाचे भाषण, ते भाषणच भाजपची दिशा दाखवणारे आहे. ते म्हणाले उत्तर प्रदेशात ''कब्रस्थानाला जेव्हढी जमीन मिळते तेव्हढी स्मशानांना मिळाली पाहिजे, मोहरमला जेव्हढी वीज दिली जाते ती दिवाळीला मिळाली पाहिजे.'' खरे तर हे मोदींचे विधान त्यांच्या इतर विधानांसारखेच १००% खोटे आहे. पण त्यांनी ते जाणीवपूर्वक करून हिंदू मतदारांना आपल्याकडे वळवले आहे. इतका खोटे बोलणारा हा पहिलाच पंतप्रधान आहे. यातून त्यांची विकासाची दिशा समजते. त्यामुळे पुढील काळात स्मशानांबरोबरच कब्रस्थानांचा अधिक विकास होईल. जिवंत माणसांना राहण्यास जागा राहणार नाही. किंबहुना माणसांना राहता येईल असा उत्तर प्रदेश, उत्तर प्रदेशात राहणार नाही.

★★★

# कॉ. पद्माकर जंगलेंना अखेरचा लाल सलाम



माकपच्या अंधेरी (प.) मुंबई शाखेचे ज्येष्ठ सदस्य व ऑटो विंडो उद्योग समूहाचे निवृत्त कामगार कॉ. पद्माकर जंगले यांचे कर्करोगाने दि. ७ मार्च २०१७ रोजी वयाच्या ६७व्या वर्षी निधन झाले. कॉ. जंगलेंना तोंडाचा कर्करोग झाल्याचे निदान पहिल्यांदा २००९ साली झाले. सुमारे एक वर्षाच्या उपचारानंतर ते बरे होऊन कामावर रुजू झाले. निवृत्त झाल्यावर पुन्हा कर्करोग उफाळून आला व संपूर्ण शरीरात पसरला. उपचाराचा काहीही परिणाम झाला नाही. कर्करोगाशी झुंजत असतानाच त्यांचे निधन झाले. दुखणे प्रचंड वाढल्यामुळे ६ मार्च रोजी कर्मचारी राज्य विमा योजना हॉस्पिटल मरोळमध्ये त्यांना दाखल करण्यात आले होते. हॉस्पिटलमध्येच त्यांचे निधन झाले.

त्यांच्या निधनाची बातमी कळल्यावर माकपच्या केंद्रीय कमिटीचे सदस्य महेंद्र सिंह, राज्य कमिटी सदस्य तसेच प. उपनगर तालुका कमिटीचे सेक्रेटरी शैलेंद्र कांबळे, मरोळ शाखेचे सचिव तसेच प. उपनगर तालुका कमिटीचे सदस्य कमल रावत, प. उपनगर तालुका कमिटीचे सदस्य शिवाजी नाटेकर, ऑटो विंडो शाखेचे ज्येष्ठ सदस्य गंगाराम रेड्डी इत्यादी हॉस्पिटलला पोहोचले व त्यांनी कॉ. जंगलेंच्या कुटुंबीयांना आवश्यक ते साहाय्य केले. त्यांच्या अंत्ययात्रेत अंधेरी शाखेचे सेक्रेटरी तसेच मुंबई कमिटीचे सदस्य के. नारायण, मुंबई कमिटीचे सदस्य ॲड. चंद्रकांत भोजगर व व्ही. शशिकुमार, कमल रावत, ऑटो विंडो शाखेचे सर्व कॉम्रेड्स आणि ऑटो विंडो उद्योग समूहाचे कामगार सामील होते. यावेळी झालेल्या श्रद्धांजली सभेत के. नारायण, ॲड. चंद्रकांत भोजगर, कमल रावत, व्ही. शशिकुमार यांची आदरांजलीपर भाषणे झाली.

कॉ. पद्माकर जंगले अतिशय निष्ठावान पक्ष सभासद होते. कर्करोगग्रस्त होण्यापूर्वी ते नियमित पक्ष व सीटूच्या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने भागीदारी करीत व इतरांचाही सहभाग घडवून आणत असत. निवृत्त होईपर्यंत सीटूला संलग्न इंजिनीयरिंग वर्कर्स युनियनचेही ते क्रियाशील कार्यकर्ते होते. कर्करोग झाल्यावर त्यांची क्रियाशीलता कमी झाली, तरीसुद्धा पक्ष शाखेच्या सर्व सभांना ते नियमित हजर राहत आणि चर्चेत भागीदारी करून इतर कॉम्रेड्समध्ये स्फूर्ती निर्माण करीत. कॉ. जंगलेंच्या निधनामुळे अंधेरी पक्ष शाखा तसेच उ. उपनगर तालुका पक्षाने एक निष्ठावान व अनुभवी कार्यकर्ता गमावला आहे.

कॉ. जंगलेंच्या पश्चात त्यांच्या कुटुंबात त्यांच्या पत्नी प्रमिला, विवाहित मुली शर्मिला व आरती आणि मुलगा राजेश आहेत. त्यांचे भाचे गंगाराम वरक हे ऑटो विंडो उद्योग समूह पक्ष शाखेचे सेक्रेटरी आहेत. कॉ. जंगलेंचे निधन त्यांच्या कुटुंबियांसाठी मोठा धक्का आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खामध्ये माकपची राज्य कमिटी, मुंबई जिल्हा कमिटी, प. उपनगर तालुका कमिटी, जीवन मार्ग, सीआयटीयुची मुंबई कमिटी, अंधेरी सेंटर व इंजीनियरिंग वर्कर्स युनियन सहभागी आहेत व त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहेत.

**कॉ. जंगले यांना अखेरचा लाल सलाम!**

# सहचिंतन

**'प्रश्न : नागरिकत्व' हे 'धर्मा'च्या निकषावर ठरविणे योग्य नाही. परंतु 'नागरिकत्व दुरुस्ती विधेयक २०१६' मध्ये ह्या तत्त्वाचे उल्लंघन झालेले आहे. माकपची त्या संदर्भात भूमिका काय आहे?**

**उत्तर :** नागरिकत्व दुरुस्ती विधेयकाचा मसुदा ठरविण्याचे काम सध्या संसदेची संयुक्त निवड समिती करीत आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तान व बांगला देशात हिंदू, ख्रिश्चन, जैन, शीख, बौद्ध, पारशी इत्यादी धर्म, 'अल्पसंख्याक' वर्गात मोडतात. त्यांतील ज्या लोकांवर ह्या देशांमध्ये धार्मिक खटले सुरू आहेत, त्यांना भारताचे नागरिकत्व देण्याचा प्रस्ताव आहे.

खरे तर दुरुस्तीचे मूळ उद्दिष्टच आक्षेपार्ह आहे. बेकायदेशीरपणे स्थलांतरीत झालेल्यांना भारताचे नागरिकत्व मिळता कामा नये, ह्यासाठी नागरिकत्वाचा कायदा आहे. परंतु प्रस्थावित दुरुस्तीमुळे अशा बेकायदा स्थलांतरीतांच्या विशिष्ट गटाला, 'धर्मा'च्या निकषांवर 'नागरिकत्व' देण्यात येणार आहे. थोडक्यात, धर्माच्या आधारावर नागरिकत्व देण्याचा मार्ग मोकळा होईल. पण त्यामुळे घटनेच्या १४व्या कलमाने दिलेल्या समानतेच्या अधिकाराच्या हमीचे उल्लंघन होणार आहे.

वरील तिन्ही देशांमधील नमूद केलेल्या सहा अल्पसंख्याक धर्मांमधील व्यक्तींना 'नैसर्गिक नागरिकत्व' प्राप्त करण्यासाठी आपल्या कायद्याने काही अटी घातल्या आहे.

१) नागरिकत्वाचा अर्ज करण्याच्या वेळी त्या व्यक्तीचे आपल्या देशात सलग १२ महिने वास्तव्य असणे बंधनकारक आहे.

२) शिवाय त्यामागील १४ वर्षांच्या कालावधीत ११ वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तावित दुरुस्तीनुसार सदर व्यक्तीचे १४ वर्षांतील वास्तव्याचा कालावधी' ११ऐवजी ८ वर्षांवर आणला आहे.

सदर विधेयकातील दुरुस्ती 'हिंदुत्वा'च्या संकल्पनेला मान्यता देणारी आहे. त्यानुसार भारत हे 'हिंदू राष्ट्र' असण्यालाही मान्यता मिळते. सबब आता भारताबाहेरील 'हिंदुंना' भारतात परतून भारताचे नागरिकत्व मिळवायचे असेल तर त्यांना विशेष सोयीसवलती देण्यात येतील.

ह्या विधेयकातील विशेषाधिकारातून मुस्लिमांना तेवढे वगळण्यात आले आहे. ह्यासंदर्भात आसाम सरकारातील एक मंत्री व भाजपचे नेते हेमंत विश्वशर्मा म्हणाले की, 'हिंदु व मुस्लीम निर्वासितांच्या बाबतीतले हे त्यांच्या पक्षाचे धोरण आहे.'

अलिकडेच इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीत केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंग ह्यांनी सदर घटना दुरुस्तीचे समर्थन करताना म्हटले आहे की, 'भारताची फाळणी धर्माच्या मुद्द्यावर झाली.' आपल्या विधानातून त्यांना असे सुचवायचे आहे की, 'पाकिस्तान मुसलमानांकरता असून जे हिंदू, जैन, शीख पाकिस्तानात राहतात, त्यांना भारतात परतण्याचा (राहण्याचा) अधिकार आहे.'

भाजपचे जबाबदार नेते अशाप्रकारे आपल्या 'हिंदुत्वा'चे घोडे पुढे दामटीत आहेत. त्यास विरोध झालाच पाहिजे. निर्वासितांसाठीचे धोरण तर्कशुद्ध (नि:संदिग्ध) असणे आवश्यक आहे. त्यांना नागरिकत्व देतांना त्यांचा (हिंदुत्ववाद्यांचा नावडता) धर्म आडवा येता कामा नये. ती प्रक्रिया निधार्मिकतेच्या पायावरच पार पडली पाहिजे.

आसाम करारानुसार (Assam Accord) नागरिकत्व देण्याची कालमर्यादा 'मार्च १९७१' ठरविण्यात आलेली आहे. दीर्घकाळ चाललेले आंदोलन व व्यापक जनमतातून हा करार अस्तित्वात आला असून सदर घटनादुरुस्तीने तो करार मोडीत निघेल. त्यामुळे आसाममधील विविध पक्ष व संघटनांनी ह्या दुरुस्तीस विरोध दर्शविला आहे.

'धर्म' ह्या निकषावर नागरिकत्व देण्याच्या कुठल्याही स्वरुपातील प्रयत्नास माकप प्रत्यक्षात विरोध करणारच पूर्व पाकिस्तान व त्यानंतर बांगला देशातून भारतात आलेल्या कित्येक बंगाली निर्वासितांना नागरिकत्व अद्याप मिळालेले नाही. ह्या निर्वासितांमध्ये 'नामशूद्र' या अनुसूचित जातीतील लोक खूप मोठ्या संख्येने आहेत. त्यांच्या नागरिकत्वाचा प्रश्न सोडविण्यासाठी आधी कालमर्यादा ठरविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विधेयकात विशेष तरतूद झालीच पाहिजे.

**प्रश्न : भारताला भ्रष्टाचाराने पुरते ग्रासले आहे. सरसकट राजकारण्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप होताना आपण पाहतो आहोत. त्यांच्यापैकी कोनावरील आरोप सिद्ध झाला आहे, कोणी निर्दोष सुटतो आहे तर कोणी निरपराधित्व सिध्द करण्यासाठी वरिष्ठ न्यायालयाकडे धाव घेत आहे. इत्यादी, इत्यादी, इत्यादी. अशा परिस्थितीत 'जोपर्यंत एखाद्याचा गुन्हा न्यायालयात सिद्ध होत नाही' तोपर्यंत त्याला अपराधी समजता कामा नये असे माकपस वाटते काय? अशा राजकारण्यांचे मोजमाप माकप कशा रितीने करते?**

**– एस. मनोहर, मेलागारम (तामिळनाडू)**

**उत्तर :** भ्रष्टाचार ही आपल्या देशातील अत्यंत गंभीर समस्या आहे. उच्च सरकारी पातळीवरील भ्रष्टाचाराची प्रकरणे ही प्रामुख्याने राजकारणी, नोकरशहा व उद्योजक ह्यांच्या संगनमतानेच घडतात. आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करीत भ्रष्टाचार करणाऱ्यांपैकी थोड्या राजकारण्यांना अशा आरोपांना सामोरे जावे लागते. 'भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा' हा फक्त सरकारी नोकरांपुरता मर्यादित आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या राजकारण्यांनादेखील अगदी काटेकोरपणे हा कायदा लागू झाला पाहिजे, असे माकपचे मत आहे.

'जोपर्यंत न्यायालयात भ्रष्टाचारावर आरोप सिद्ध होत नाही, तोपर्यंत त्या व्यक्तीस निरपराध समजण्याबाबत माकपचे मत काय आहे' ह्या तुम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नातच उत्तर साठले आहे. आपल्या देशातील कायदेप्रणालीचा पायाच मुळी ह्या तत्त्वावर बेतलेला आहे. तेव्हा या समस्येचा विचार थोडा वेगळ्या पद्धतीने करता येईल. मंत्रीपद उपभोगणाऱ्या व्यक्तीवर भ्रष्टाचाराचे आरोपपत्र दाखल होताच तिने आपल्या अधिकारपदाचा त्याग करावा असे आमचे स्पष्ट मत आहे.

भ्रष्टाचाराचा आरोप असलेली किंवा झालेली सरकारी पक्षावरील व्यक्ती आणि राजकीय चळवळीतील कामाच्या अनुभवाने तिच्यावर खटला दाखल झाला आहे अशी पदाधिकारी व्यक्ती ह्या दोहोंमध्ये माकप तफावत करतो. पहिल्या गटातील(पदाधिकाऱ्यावरील) व्यक्तीने भ्रष्टाचाराचा आरोप सिद्ध होण्याची वाट न पहाता ताबडतोब पक्ष त्याग करायलाच हवा. परंतु भ्रष्टाचारापेक्षाही राजकीय चळवळीच्या अनुषंगाने खटल्यात अडकलेल्या व्यक्तीने पदत्याग करण्याची गरज नाही. खटल्याचा निकाल जेव्हा तिच्या विरोधात जाईल, तेव्हा मात्र पक्ष त्याग करणे क्रमप्राप्त आहे.

**(अनुवाद : हिरा जनार्दन)**

# ८ मार्च : आंतरराष्ट्रीय महिला दिन महाराष्ट्रभर उत्साहात साजरा ; १०,००० महिलांचा सहभाग

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही ८ मार्च या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संघटनेच्या केंद्रीय कमिटीने या वर्षीच्या महिला दिनानिमित्त 'प्रत्येक हाताला काम - समान कामाला समान वेतन; प्रतिगामी, धर्मांध, मनुवादी शक्तींविरुद्ध एकजुटीने संघर्ष करा; महिला आरक्षण विधेयक त्वरित मंजूर करा' अशी मागण्यांची त्रिसूत्री जाहीर केली होती. या तीन मागण्या तसेच महिलांवरील वाढते अत्याचार, महागाईचा भस्मासुर, गॅस सिलिंडरची प्रचंड भाववाढ, आरोग्य व्यवस्थेचे वाजलेले तीनतेरा व नोटाबंदी करून सरकारने लादलेली चलन आणीबाणी अशा महिलांच्या आयुष्यावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या समस्या घेऊन राज्यभर विविध आंदोलने, मेळावे, बैठका आयोजित करण्यात आल्या. एकूण १०,०००हून अधिक महिलांचा सहभाग असलेल्या या कार्यक्रमांचे संकलित वृत्त येथे देत आहोत.

**ठाणे-पालघर** जिल्ह्यात ३ ते १० मार्च या सबंध आठवड्यात तालुका स्तरावर विविध कार्यक्रम घेण्यात आले. त्या सर्वांत एकूण ८,०००हून अधिक महिला सामील झाल्या. तलासरी येथे तब्बल ४००० महिलांनी काढलेली प्रचंड रॅली व जाहीर सभा, शहापूर तालुका कचेरीवर काढलेला १५०० महिलांचा हंडा मोर्चा, विक्रमगड येथे १५०० महिलांचा मेळावा, डहाणूत ७०० महिलांची सभा, वाडा (१७०), ठाणे शहरी भागात भिवंडी व वांगणी (२५०), पालघर (५०) येथील मेळावे असा हा भरगच्च आठवडा होता. या विविध कार्यक्रमांत जमसंच्या अखिल भारतीय सरचिटणीस मरियम ढवळे, जिल्हा सचिव लहानी दौडा, जिल्हा अध्यक्ष प्राची हातिवलेकर, जिल्हा पदाधिकारी ताई बेंदर, हीना वनगा, सुनिता ओझरे, प्रमिला साठे, सविता डावरे, सुनिता शिंगडा, मेरी रावते, कमलताई वानले, रमा तारवी, तसेच अंगणवाडीच्या नेत्या तारामती पतंगे, वृषाली पाटील यांचाही सहभाग होता.

**रायगड** जिल्ह्यात ३००-३५० महिलांच्या उपस्थितीत प्रभावी मेळावा घेण्यात आला. मेळाव्याचे प्रास्ताविक राज्य सहसचिव हेमलता पाटील यांनी केले. केंद्रीय कमिटीची त्रिसूत्री तसेच महिलांचे प्रश्न या विषयावर प्रमुख मार्गदर्शन जमसंच्या नेत्या अमिता ठाकूर यांनी केले. यावेळी नुकत्याच झालेल्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांत डाव्या व पुरोगामी पक्षांतर्फे निवडून आलेल्या मानसी पाटील, कुसुम ठाकूर, चंपा पाटील या महिला सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

**सोलापूर** जिल्ह्यात महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात डॉ. उषा शहा व प्रा. शीला पटवर्धन यांनी अनुक्रमे महिलांचे आरोग्य व त्यांचे समाजातील स्थान या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेविका व सोलापूर जिल्हाध्यक्ष नसीमा शेख होत्या. या वेळी नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत निवडून आलेल्या जमसंच्या नेत्या कामिनीताई आडम व सुप्रिता शेंडगे यांचा सत्कार करण्यात आला. २५० महिलांच्या उपस्थितीत झालेल्या या मेळाव्याला संघटनेच्या नेत्या नलिनीताई कलबुर्गी, शेवंताताई देशमुख, लिंगव्वा सोलापुरे, सुनंदा बल्ला, शकुंतला पाणीभाते, अरुणा गेंट्याल, संध्या कांबळे तसेच एसएफआयच्या नेत्या मीरा कांबळे यांनी संबोधित केले.

**सांगली** जिल्ह्यात ८ मार्च तसेच १० मार्च हा सावित्रीबाई फुले यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. यावेळी महिलांवरील वाढते अत्याचार, स्त्री भ्रूणहत्या, एकूण आरोग्य व्यवस्था, गॅस दरवाढ या सर्व प्रश्नांवर तीव्र निदर्शने करण्यात आली. म्हैसाळ येथील स्त्री-भ्रूणहत्या करणाऱ्या डॉ. खिद्रापुरेसोबत त्याकडे डोळेझाक करणाऱ्या आरोग्य समिती, वैद्यकीय अधिकारी व पोलिसांवर देखील कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सांगली जिल्हा सचिव रेहाना शेख, सहसचिव दिलशाद टिनमेकर, बेबी जोहरा नदाफ या नेत्यांनी केली.

**मुंबई** येथे विविध समविचारी महिला संघटनांतर्फे एक संयुक्त रॅली काढण्यात आली व नंतर या रॅलीचे सभेत रूपांतर झाले. यावेळी जमसंच्या राज्य सचिव सोन्या गिल यांचे प्रमुख मार्गदर्शनपर भाषण झाले. महिलांवरील अत्याचार व सुरक्षिततेचे विविध उपाय यांविषयी एक शॉर्ट फिल्म दाखवण्यात आली. जमसंसमवेत घर कामगार, कामकाजी महिलांसमवेत एकूण ३००-३५० महिला उपस्थित होत्या.

**पुणे** येथे स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समितीतर्फे मेळावा घेण्यात आला. वाढती असहिष्णुता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, दहशतवाद-युद्धखोरी-वंशवादाला विरोध, घटनेचे संरक्षण या सर्व विषयांसोबतच महिलांवरील वाढते अत्याचार, महागाई-रेशन-पाणी समस्या व नोटाबंदीचे विपरीत परिणाम या विषयांवर सरस्वती भांदिर्गे, सुभद्रा खिलारे, हिराबाई घोंगे व विविध संघटनांच्या नेत्यांनी आपले विचार व्यक्त केले.

**सातारा** जिल्ह्यातील कराड व कोरेगाव या तालुक्यांत घेण्यात आलेल्या महिला मेळाव्यात माया तडाखे व आशा सेविका राधाताई साठे यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. तर आनंदी अवघडे यांनी महिलांनी संघटित होऊन लढा देण्याचे आवाहन केले.

**कोल्हापूर** येथे देखील जमसंच्या वतीने एक मोर्चा व महिला मेळावा आयोजित करण्यात आला. पुरोगामी विचारवंत प्रा. ए.बी. पाटील व जमसंच्या नेत्या मुमताज हैदर यांनी या मेळाव्याला संबोधित केले.




**वर्धा** येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात महिलांच्या समस्यांसोबतच भाजपचे आमदार प्रशांत परिचारक यांनी सैनिकांच्या पत्नींविषयी काढलेल्या अनुद्गारांचा निषेध करून त्यांच्यावर कारवाईची मागणी केली. यावेळी झालेल्या सभेत जमसंच्या ज्येष्ठ नेत्या प्रभाताई घंगारे, जिल्हा सचिव दुर्गा काकडे, अध्यक्ष प्रतिक्षा हाडके यांची भाषणे झाली.

**नागपूर** येथील संविधान चौकात महिलांची एक सभा घेण्यात आली व महागाई, रेशन , शिक्षण, रोजगार, महिला व अल्पसंख्याकांवरील अत्याचार, तसेच घर कामगारांना किमान वेतन व ३००० रु. निवृत्ती वेतन इ. मागण्यांविषयी जिल्हाधिकाऱ्यांना एक निवेदन जमसंच्या वतीने देण्यात आले.

**(संकलन : प्राची हातिवलेकर)**

# नागपूरच्या डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये सीताराम येचुरींच्या व्याख्यानाला प्रचंड प्रतिसाद!

माझा कार्यक्रम कुणाच्या दबावामुळे रद्द झाला, हे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरूच स्पष्टपणे सांगू शकतात. आधी कार्यक्रम ठरवणे आणि नंतर तो रद्द करणे यामागे निश्चितच दबाव असेल. मात्र, नेमका तो कुणाचा हे कुलगुरूंनी आता तरी स्पष्ट करावे, असा टोला खासदार सीताराम येचुरी यांनी लगावला. लोकशाहीत सर्वांना मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे आणि सध्या मत स्वातंत्र्याची गळचेपी सर्वत्र सुरू आहे. त्याच्यामागे कोण आहे हे सर्वांना ठाऊक आहे, अशी टीका त्यांनी संघवर्तुळाचे नाव न घेता केली.

नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचा कार्यक्रम विनापरवानगीने घेतल्याच्या कारणास्तव कुलगुरूंनी १८ मार्चला होणारे खासदार सीताराम येचुरी यांचे भाषण रद्द केले. मात्र, दीक्षाभूमीच्या डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या इतिहास, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र विभागांनी आयोजनाची जबाबदारी स्वीकारत कुंभारे सभागृहात त्याचवेळी आणि त्याच विषयावर येचुरींचे भाषण आयोजित केले. तत्पूर्वी प्रसार माध्यमांशी बोलताना येचुरी यांनी ही भावना व्यक्त केली. निमंत्रण पत्रिका छापल्या, विमानाची तिकिटे पाठवली. कुलगुरू कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असल्याचे त्यांच्या पत्रिकेवरून कळले आणि तरीही कार्यक्रम रद्द होत असेल तर निश्चितच दबाव आहे आणि तो कुणाचा आहे, हे कुलगुरूच सांगू शकतील, असे ते म्हणाले. व्याख्यानादरम्यानही कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार होता. मात्र, तो होऊ शकला नाही. विचारांना घाबरणे यापेक्षा भेकडपणा काय असू शकतो ? या शब्दांत येचुरी यांनी संताप व्यक्त केला.

येचुरींचे व्याख्यान रद्द केल्याविरुद्ध डॉ. यशवंत मनोहर, डॉ. नितीन राऊत, नागेश चौधरी, डॉ. खरात, डॉ. अशोक गोडघाटे इ.चे शिष्टमंडळ कुलगुरूंना भेटले व या निर्णयास त्यांनी तीव्र विरोध दर्शविला.

## समता, बंधुता, स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी उभे रहा!

समानतेविना देशात विकास शक्य नाही. मात्र, सामाजिक आणि आर्थिक दरी वाढत आहे. निवडणुकीत कोणी जिंकून येवो अथवा न येवो, जर समता, बंधुता आणि स्वातंत्र्यावर हल्ला होत असेल तर त्याच्या संरक्षणासाठी आपण उभे राहणे म्हणजेच देशभक्ती होय. हिंदुत्ववादी राष्ट्रीयत्व नव्हे तर समतेवर आधारित भारतीयत्व हेच राष्ट्रीयत्व होय. मात्र जर कोणी धर्म, जाती, सामाजिक किंवा आर्थिक आधारावर असमानतेच्या गोष्टी करत असतील तर त्या विरोधात उभे ठाकणे, हा संकल्प प्रत्येकाने करायला हवा, असे आवाहन खासदार सीताराम येचुरी यांनी डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील कुंभारे सभागृहात आयोजित व्याख्यानात केले. या व्याख्यानाचा विषय 'लोकशाहीचा ऱ्हास : आव्हाने आणि उपाय' असा होता. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार होते. डॉ. गौतम कांबळे यांनी प्रास्ताविक केले, डॉ. अविनाश फुलझेले यांनी सूत्रसंचालन केले आणि प्रा. विद्या सोरपगार यांनी आभार प्रदर्शन केले.

येचुरी म्हणाले, आज सामाजिक आणि आर्थिक असमानता हेच मोठे आव्हान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचे रक्षण जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत देशात समानतेवर आधारित लोकशाही टिकणार नाही. संविधानाने एक व्यक्ती एका मताचा अधिकार दिला. त्याबाबतीत टाटा, बिर्ला, अंबानी, अदानी आणि आपण समान आहोत; मात्र, आज टाटा, बिर्ला, अंबानी, अदानी आणि आपण यांच्यातील सामाजिक आणि आर्थिक स्तराचे मूल्य एक नाही. जोपर्यंत हा अंतर्विरोध दूर होत नाही, तोपर्यंत लोकशाही या देशात विकसित होऊ शकणार नाही. सामान्य माणसाचे हाल होत आहेत आणि असमानता वाढत आहे. असमानता जेवढी वाढेल तेवढाच आपल्या लोकशाहीला धोका निर्माण होईल.

मात्र, देशभक्तीच्या नावाखाली लोकांना छळले जात आहे. मेलेल्या गायीचे कातडे काढले नाही तरीही आणि कातडे काढले तरीही एससी, एसटीला लक्ष्य केले जात आहे. आज देशात एससी, एसटीवर हल्ल्यांचे प्रमाण २३ टक्क्याने वाढले आहे. भाजपच्या मोदी सरकारच्या गेल्या दोन वर्षांत देशातील कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्या ४२ टक्क्यांनी वाढल्या आहेत. देशभक्तीच्या नावाखाली देशात उन्माद दिसून येतो. धर्म आणि जातीच्या आधारावर असमानता जाणीवपूर्वक पसरवली जात आहे. अशी असमानता पसरवणाऱ्यांच्या विरोधात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या रक्षणार्थ आपल्याला उभे राहिले पाहिजे. समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या संरक्षणासाठी उभे राहणे म्हणजे देशभक्ती होय. नोटबंदी, उत्तरप्रदेश व पंजाब निवडणुका, अनुसूचित जाती-जमातींवरील अत्याचार, हिंदुत्ववादी राष्ट्रीयत्त्व आणि भारतीय राष्ट्रीयत्त्व या विषयांवर ते बोलले.

येचुरींचे भाषण ऐकण्यासाठी कुंभारे सभागृह खचाखच भरले होते. जय भीमच्या घोषणा देतच येचुरी यांना सभागृहापर्यंत आणण्यात आले. दोन तास भाषण उशिरा सुरू होऊनही लोक येचुरींची वाट पाहत आंबेडकर महाविद्यालयाच्या सभागृहात आणि बाहेर ताटकळत होते. गर्दी वाढल्याने परिसरातच स्क्रीन व स्पीकर लावण्यात आला आणि ५००० हून अधिक नागरिकांनी शेवटपर्यंत भाषण ऐकले.

विमानतळावर सर्व डाव्या व धर्मनिरपेक्ष पक्षांनी खासदार सीताराम येचुरींचे जंगी स्वागत केले. 'लाल सलाम' आणि 'जय भीम'च्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला. ५०० हून अधिक गाड्या व मोटारसायकल्सच्या ताफ्याने येचुरींना शहरात आणले. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्यांना येचुरींनी पुष्पहार अर्पण केल्यानंतर त्यांनी दीक्षाभूमीला भेट देऊन गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन केले.

**– मनोहर मुळे / दिलीप देशपांडे**